# ‘केआयटी’मध्ये आज मतदार नोंदणी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

जिल्हा निवडणूक प्रशासन व महाराष्ट्र टाइम्सतर्फे येथील केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये नव मतदार नोंदणी आणि जागृतीचा कार्यक्रम आज, मंगळवारी आयोजित केला आहे. दुपारी साडेतीन वाजता कार्यक्रमास प्रारंभ होईल. निवडणूक विभागाच्या उपजिल्हाधिकारी स्नेहल भोसले, प्रांताधिकारी सचिन इथापे

**‘मटा’ व निवडणूक प्रशासनातर्फे आयोजन**

हे यावेळी प्रमुख उपस्थित राहणार आहेत. यावेळी मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी अर्ज करता येणार आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगातर्फे मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम राबवला जात आहे. १ सप्टेंबरपासून कार्यक्रम व्यापकपणे राबवला जात आहे. त्यात नविन मतदार नोंदणीसाठी अर्ज भरून घेणे, नाव वगळणे, नाव, पत्यात दुरूस्ती करण्याची प्रक्रिया सुरू आहे. १८ वर्षे झालेल्या प्रत्येकाचे नाव मतदार यादीत असावे, यासाठी प्रशासन जागृती करीत आहे.

जिल्ह्यात १८ ते १९ वर्षे वयोगटातील सव्वा लाख युवक, युवती आहेत. यापैकी केवळ दहा हजारजणांनी प्रशासनाकडे अर्ज केले आहेत. अजूनही मोठ्या संख्येने यादीबाहेर नवमतदार आहे. यामुळे निवडणूक प्रशासनाने विद्यापीठास विनंती करून प्रत्येक महाविद्यालयात नवमतदार नोंदणी कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन केले. त्यानुसार केआयटीने कार्यक्रम आयोजित केला आहे. यावेळी केआयटीचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी, प्रा. विजय रोकडे, नोडल अधिकारी महेश नाझरे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी उपजिल्हाधिकारी भोसले, प्रांताधिकारी इथापे मार्गदर्शन करणार आहे. त्यानंतर प्रत्यक्षात मतदार यादीतील नावासाठी अर्ज भरून घेण्यात येणार आहे.



### ... तर नाव नोंदवता येणार

परजिल्हा, गावातून शिक्षणासाठी कोल्हापुरात आलेले विद्यार्थी सुट्टी पडल्यानंतर गावी जातात. तोपर्यंत मतदार यादी नाव नोंदणी मोहिम संपलेली असते. म्हणून अशा विद्यार्थ्यांचेही अर्ज भरून घेतले जात आहेत. अर्ज संबंधित विद्यार्थ्यांच्या गावातील मतदान केंद्राकडे पाठवण्यात येणार आहे. याशिवाय परिसरातील वसाहत, गावातील १८ वर्षे पूर्ण झालेल्यांनाही नाव नोंदणी करता येणार आहे.

### शेवटची संधी

लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करावयाचे असल्यास या महिनाअखेर नाव नोंदणीसाठी अर्ज भरावा लागणार आहे. त्यासाठी निवडणूक प्रशासन महाविद्यालयात येत आहे. इच्छुकांना महाविद्यालयातच नाव नोंदवण्याची शेवटची संधी आहे. त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी भोसले यांनी केले आहे.

### ही कागदपत्रे आवश्यक

जन्म पुराव्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला, अथवा बोनाफाईड प्रमाणपत्र, ग्रामसेवक किंवा तलाठीचा रहिवासी दाखला, आधार कार्ड झेरॉक्स, १ पासपोर्ट आकाराचा फोटो, घरातील नात्यातील एकाचे मतदान ओळखपत्र झेरॉक्स.

# विद्यापीठात शनिवारी माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शनिवारी (दि. २०) माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. वि. स. खांडेकर भाषा भवन येथे सकाळी ११.30 वा. स्नेहमेळावा होणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ६६६. ४ल्ब्रॅ्र्फ्र.ु्ल्ल. या संकेतस्थळावर नावनोंदणी करावी, असे आवाहन शिवाजी युनिव्हर्सिटी अॅल्युमनी असोसिएशनचे समन्वयक डॉ. जी. एस. राशीनकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले.

## पोस्टर प्रदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मानसशास्त्र अधिविभागामार्फत जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त 'आजचे युवक व मानसिक आरोग्य' या विषयावर पोस्टर प्रदर्शन झाले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते बुधवारी सकाळी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. भारती पाटील, प्रा. अमोल कांबळे आदी उपस्थित होते.

16 OCT 2018
Times of India

# Workshop on research methodology

TIMES NEWS NETWORK

Kolhapur: The Department of Geography of the Shivaji University, Kolhapur (SUK) in association with the Indian Council of Social Science Research (ICSSR) is set to organise a 10-day research methodology course from December 19 to December 28.

This is aimed at helping scholars advance knowledge of the subject and bring them abreast of contemporary social, economic and environmental problems, with specific focus on the region.

"This research methodology course is sponsored by ICSSR, New Delhi. The course will include various aspects of research methodology and techniques used in the field of geography and allied social sciences," a release from the university said.

All registered MPhil/PhD scholars in recognised Indian universities from any branch of the social sciences may apply for the course, which will admit 30 scholars. The deadline for applications is November 26.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 OCT 2018
Times of India

# UGC asks colleges to submit data on skill-based courses

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked colleges across the country, which were allowed to run courses under the national skill qualifications framework (NSQF) to send data of course-wise intake of students and faculty recruited this year, by October 21.

In a notice on October 15, it said institutions which received extension for their ongoing skill-based courses are also requested to share the details by October 17.

With focus on raising the employability of graduates and meeting the industry's requirement for ready-to-work students, the courses under NSQF seek to provide skill and specialization in different vocations. It has a multiple-exit provision -- a diploma at the end of the first year and an advanced diploma after two years.

The NSQF was approved in December 2013 by the cabinet committee on skill development. Under NSQF vocational education in different sectors is offered. The UGC has offered courses in 10 sectors, which include automobile, information technology, entertainment, telecommunication, marketing, agriculture, arts, and printing and publishing. TNN